सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष १, अंक १५(२) ] शुक्रवार, जुलै ३, २००९/आषाढ १२, शके १९३१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १८.००

असाधारण क्र. ३४

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.**—मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम .. | १-४ |


दिनांक २ जुलै २००९ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.

( मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ३ जुलै २००९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम. )

## मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १८ मे २००९ रोजी मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, २००९ प्रख्यापित केला होता ;

१९५० चा मुंबई २९. २००९ चा महा. अध्या. ८.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या साठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, २००९ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १८ मे २००९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ६६ ची सुधारणा.

**२.** मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ६६ ऐवजी, पुढील कलमे दाखल करण्यात येतील :— १९५० चा मुंबई २९.

शास्ती.

"**६६.** जी कोणी व्यक्ती, खाली दिलेल्या तक्त्याच्या पहिल्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या कलमांपैकी कोणत्याही कलमाच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील तिला, अपराधसिद्धीनंतर अशा प्रत्येक अपराधाबद्दल, उक्त तक्त्याच्या तिसऱ्या स्तंभात; त्याबाबतीत नमूद केलेल्या रकमेपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—** उक्त तक्त्याच्या दुसऱ्या स्तंभातील ' विषय ' या शीर्षकाखाली दर्शविलेल्या नोंदी या, पहिल्या स्तंभात नमूद केलेल्या कलमात वर्णन केलेल्या अपराधाच्या व्याख्या म्हणून किंवा या कलमांचा सारांश म्हणूनही दिलेल्या नाहीत, परंतु पहिल्या स्तंभात ज्यांचे क्रमांक दिलेले आहेत त्या कलमांच्या विषयासंबंधीचे केवळ निर्देश म्हणून त्या समाविष्ट केल्या आहेत.

**तक्ता**

| कलम<br>(१) | विषय<br>(२) | बसविता येईल तो दंड<br>(३) |
|---|---|---|
| | | रुपये |
| कलम १८, पोट-कलमे (१) व (४) | सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची मुदतीच्या आत नोंदणी करण्यासाठी धर्मादाय उप-आयुक्ताकडे किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताकडे अर्ज करण्याचे विश्वस्ताचे कर्तव्य. | १०,००० |
| कलम १८, पोट-कलम (७) | विवक्षित अधिकारी व प्राधिकारी यांच्याकडे स्थावर मालमत्तेसंबंधीचे ज्ञापन, मुदतीच्या आत पाठविण्याचे विश्वस्ताचे कर्तव्य. | १०,००० |
| कलम २२ | बदलासंबंधी अहवाल पाठविण्यात कसूर करणे. | १०,००० |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | | रुपये |
| कलम २२ख | तरतूद करण्यात आलेल्या मुदतीच्या आत, अर्ज करण्यात कसूर करणे. | १०,००० |
| कलम २२ग | तरतूद करण्यात आलेल्या मुदतीच्या आत, ज्ञापन पाठविण्यात कसूर करणे. | १०,००० |
| कलम २९ | सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नोंदणीसाठी तरतूद केलेल्या मुदतीत, अर्ज करण्या-संबंधीचे मृत्यूपत्र व्यवस्थापकाचे कर्तव्य. | १०,००० |
| कलम ३२ | नियमितपणे लेखे ठेवण्यासंबंधीचे कर्तव्य | १०,००० |
| कलम ३५ | सरकारी रोख्यात पैसे गुंतविण्यात कसूर करणे किंवा ते न गुंतविणे. | १०,००० |
| कलम ५९ | (धर्मादाय आयुक्ताव्यतिरिक्त) विश्वस्ताने किंवा धर्मादाय रकमांची आकारणी करणाऱ्या किंवा त्या वसूल करणाऱ्या व्यक्तीने कलम ५८ अन्वये अंशदान देण्यात कसूर करणे. | १०,००० |

**६६क.** जो कोणी, धर्मादाय आयुक्ताची पूर्वमंजुरी न घेता विश्वस्तव्यवस्थेची स्थावर मालमत्ता अन्य संक्रमित करील किंवा तसे करण्याचा प्रयत्न करील त्याला कलम ३६ च्या तरतुदीचे उल्लंघन केल्यावरून अपराधसिद्धीनंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या साध्या कारावासाची शिक्षा किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

कलम ३६ च्या तरतुदींचे उल्लंघन करण्याबाबतची शास्ती.

**६६ख.** जो कोणी, कलम ४१कक अन्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही निदेशांचे अनुपालन करण्यात, वाजवी कारणाशिवाय कसूर करील, त्याला अपराधसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल अशा साध्या कारावासाची शिक्षा किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील. ".

कलम ४१कक च्या तरतुदींचे उल्लंघन करण्याबाबतची शास्ती.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६७ मध्ये, " रु. १,००० " या मजकुराऐवजी, " रु. १०,००० " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ६७ ची सुधारणा.

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ मध्ये कलम ६७क समाविष्ट करणे.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

अपराध आपसात मिटवणे.

" **६७क.** (१) ज्याच्या निदेशांन्वये तक्रार दाखल केली आहे असा सहायक धर्मादाय आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची कार्यवाही, एकतर ती सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू केल्यानंतर, अशा अपराधासाठी दोषारोप ठेवलेल्या एखाद्या व्यक्तीकडून, त्याला योग्य वाटेल अशी अपराध आपसात मिटवण्याची रक्कम प्राप्त झाल्यावर, आरोपीच्या कसुरीचे स्वरूप, त्याचे पूर्व व विद्यमान वर्तन आणि अन्य संबद्ध घटक लक्षात घेऊन, अपराध आपसात मिटविण्याकरिता, प्राधिकृत करील :

परंतु, अपराध आपसात मिटविण्याची रक्कम त्या त्या कलमांन्वये तरतूद केलेल्या द्रव्यदंडाच्या अधिकतम रकमेच्या एक चतुर्थांशापेक्षा अधिक नाही इतकी असेल.

(२) अशाप्रकारे अपराध आपसात मिटवून वसूल करण्यात आलेली रक्कम सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या प्रशासनिक निधीमध्ये जमा करण्यात येईल. ".

सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृत्ती.

५. (१) मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, २००९, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २००९ चा महा. अध्या. ८.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कारवाई (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला कोणताही आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली कृती किंवा, यथास्थिती, कारवाई, किंवा काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक २६(२)] शुक्रवार, जुलै ३, २००९/आषाढ १२, शके १९३१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ५२


प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Public Trusts (Amendment) Act, 2009 (Mah. XX of 2009), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XX OF 2009

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 3rd July 2009).*

An Act further to amend the Bombay Public Trusts Act, 1950.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Public Trusts Act, 1950, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Bombay Public Trusts (Amendment) Ordinance, 2009, on the 18th May 2009 ;

Bom. XXIX of 1950. Mah. Ord. VIII of 2009.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixtieth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

1. (*1*) This Act may be called the Bombay Public Trusts (Amendment) Act, 2009.

(2) It shall be deemed to have come into force on the 18th May 2009.

Amendment of section 66 of Bom. XXIX of 1950.

2. For section 66 of the Bombay Public Trusts Act, 1950 (hereinafter referred to as "the principal Act"), the following sections shall be substituted, namely :— Bom. XXIX of 1950.

Penalty.

"66. Whoever contravenes any provision of any of the sections mentioned in the first column of the following table shall, on conviction, for each such offence, be punished with fine which may extend to the amount mentioned in that behalf in the third column of the said table.

*Explanation.*—The entries in the second column of the said table headed "Subject" are not intended as the definitions of offences described in the sections mentioned in the first column or even as abstracts of those sections, but are inserted merely as references to the subject of the sections, the numbers of which are given in the first column :—

TABLE

| Section (1) | Subject (2) | Fine which may be imposed (3) |
|---|---|---|
| | | Rs. |
| Section 18, sub-sections (*1*) and (*4*) | Duty of trustee to make an application to Deputy or Assistant Charity Commissioner for registration of public trust within time. | 10,000 |
| Section 18, sub-section (*7*) | Duty of trustee to send memoranda of movable property to certain officers and authorities within time. | 10,000 |
| Section 22 | Failure to report a change. | 10,000 |
| Section 22B | Failure to make an application within the time provided for. | 10,000 |
| Section 22C | Failure to send memoranda within the time provided for. | 10,000 |
| Section 29 | Duty of an executor to apply for the registration of a public trust within the time provided for. | 10,000 |
| Section 32 | Duty to keep regular accounts. | 10,000 |
| Section 35 | Failure or omission to invest money in public securities. | 10,000 |

| (1) | (2) | (3) |
|---|---|---|
| | | Rs. |
| Section 59 | Failure to pay contribution under section 58 by a trustee (other than the Charity Commissioner) or by a person charging or collecting *dharmada*. | 10,000 |

**66A.** Whoever alienates or attempts to alienate any immovable property of the trust without the previous sanction of the Charity Commissioner in contravention of the provision of section 36 shall, on conviction, be punished with simple imprisonment, which may extend to six months or with fine, which may extend to rupees twenty-five thousand, or with both.

Punishment for contravention of provisions of section 36.

**66B.** Whoever fails without reasonable cause to comply with any directions issued under section 41AA shall, on conviction, be punished with simple imprisonment, which may extend to three months or with fine which may extend to rupees twenty thousand, or with both. ".

Punishment for contravention of provisions of section 41AA.

**3.** In section 67 of the principal Act, for letters and figures " Rs. 1,000 " the letters and figures " Rs. 10,000 " shall be substituted.

Amendment of section 67 of Bom. XXIX of 1950.

**4.** After section 67 of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Insertion of section 67A in Bom. XXIX of 1950.

" **67A.** (*1*) The officer not below the rank of Assistant Charity Commissioner under whose direction the complaint has been lodged may, either before or after the institution of proceedings for any offence punishable under this Act, on receipt of composition amount, which he deems fit, having regard to the nature of the default, past and present conduct of the accused and other relevant factors, may authorise compounding of offence :

Compounding of offence.

Provided that, the composition amount shall not exceed one-fourth of the maximum amount of fine provided under the respective sections.

(*2*) The amount of composition of offences so recovered shall be credited to the Public Trust Administration Fund. ".

Repeal of Mah. Ord. VIII of 2009 and saving.

**5.** (*1*) The Bombay Public Trusts (Amendment) Ordinance, 2009, is hereby repealed. Mah. Ord. VIII of 2009.

(2) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued), under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.